**सोलापूर विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यासाठी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागामार्फत खालीलप्रमाणे योजना राबविण्यात येतात.**

**अपघात विमा योजना :-** सोलापूर विद्यापीठांतर्गत विद्यार्थी कल्याण मंडळामार्फत संलग्नित महाविद्यालयात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यासाठी विमा योजना लागू करण्यात आलेली आहे. सर्व विद्यार्थी पालक तसेच शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांनासुध्दा सदर विमा योजनेचा लाभ देण्यात येतो.दुर्देवाने विद्यार्थ्याचा अपघात झाल्यास मयताच्या पालकास एक लाखापर्यंतची भरपाई विमा कार्यालयाकडून आदा करण्यात येते.

**नियतकालिका स्पर्धा आयोजन :-** सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांमधील सुप्त कला गुणांना वा देण्यासाठी व त्यांच्यात लेखनाची अविट गोडी निर्माण व्हावी, विद्यार्थ्यात बहूश्रूतता रूजवावी तसेच त्यांच्या अध्यायन व अध्यापनाच्या कक्षा रुंदावण्यासाठी व्यवसायिक व पारंपारिक महाविद्यालयाची विद्यापीठ स्तरावर नियतकालिक स्पर्धा आयोजित करण्यात येते. या स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनींना प्रोत्साहनपर बक्षिसे व प्रमाणपत्र देण्यात येतात.

**विद्यापीठ स्तरीय युवा महोत्सव :-** सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांमधील सांस्कृतिक कला व गुणांना वाव देण्यासाठी आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवाचे विद्यापीठ स्तरावर आयोजन करण्यात येते. यशस्वी विद्यार्थी / विद्यार्थिनींना विविध कलाप्रकारात प्रथम ,व्दितीय व तृतिय आलेल्या कलाकारांना प्रोत्साहनपर बक्षिस व प्रमाणपत्र देण्यात येतात. आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवात अनुक्रमे प्रथम व व्दितीय येणा-या विद्यार्थी कलाकारांसाठी विद्यापीठामार्फत खास प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून राजभवन आयोजीत अंतर विद्यापीठ स्तरीय इंद्रधनुष्य युवा महोत्सवात सहभागी करण्यात येते. तसेच इंद्रधनुष्य युवा महोत्सवात सहभागी होवून यश संपादन करणा-या संघास विद्यापीठामार्फत प्रशिक्षण देवून पश्चिम विभागीय युवा महोत्सवात सहभागी करण्यत येते. पश्चिम विभागीय स्तरावरील युवा महोत्सवात यशस्वी होणा-या संघाला विविध कलाप्रकारातील उच्च दर्जाच्या मार्गदर्शकांकडून प्रशिक्षण देवून राष्ट्रीय पातळीवरील आयोजित युवा महोत्सवात सहभागी करण्यात येते.

**युवा नेतृत्व शिबिर :-** विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या शहरी तसेच ग्रामीण भागातील महाविद्यालयात शिक्षण घेणा-या विद्यार्थी हे आजच्या स्पर्धात्मक युगात नेतृत्वगुणात कमी पडू नये व त्याच्यातील युवा नेतृत्वाचे गुण विकसित करण्याच्या दृष्टिकोनातून विद्यापीठातर्फे 'कर्णधार' हे शिर्षक घेऊन नेतृत्वासाठी व्यक्तिमत्वाचा विकास या भूमिकेतून युवा नेतृत्व शिबिराचे आयोजन करण्यात येते. अनेक अनुभवी व प्रख्यात असलेल्या विविध शासकीय पदावर कार्यरत प्रशासकीय अधिका-यांना मार्गदर्शन करण्यासाठी शिबिरास निमंत्रित केले जाते.